# मुंबई-पुण्यात लॉकडाऊनमध्ये सर्वाधिक कौटुंबिक हिंसाचार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सुरू असलेल्या लॉकडाऊनमध्ये २४ मार्च ते २८ मे २०२० या कालावधीत राज्यात कौटुंबिक हिंसाचाराच्या १७१ घटना घडल्या आहेत. विशेष म्हणजे कोरोनाची झळ बसलेल्या मुंबई आणि पुणे या महानगरांमध्ये सर्वाधिक घटना घडल्या आहेत.

कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये पती-पत्नीची भांडणे, सुनेकडून सासू किंवा सासूकडून सुनेचा छळ तसेच पती नांदवत नसल्याच्या कारणांचा समावेश आहे. मुंबईत दोघा परिचारिकांना त्या राहात असलेल्या हाऊसिंग सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी इमारतीत प्रवेशास हरकत घेतली. यविरोधात या परिचारकांनी थेट महिला आयोगाकडे तक्रारी केल्या आहेत. या दोन्ही परिचारिकांची महिला आयोगाने दखल घेत पोलिसांचा हस्तक्षेप करून त्यांना त्यांच्या घरात प्रवेश मिळवून दिला.

कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये पोलिसांकडून न्याय मिळत नसल्याची भावना



झालेल्या अनेक महिलांनीही आयोगाचा दरवाजा ठोठावला आहे. सध्या लॉकडाऊन असल्यामुळे आयोगाच्या कार्यालयात तक्रार करण्यासाठी महिला येऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी थेट ई-मेलद्वारे या तक्रारी केल्या आहेत. ई-मेलद्वारे तक्रारी इतक्या मोठ्या प्रमाणात येण्याची ही पहिलीच घटना असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव आस्था लुथरा यांनी दिली.

औरंगाबाद महसूल विभागातून १४, अमरावती ११, नाशिक १७, पुणे ३८, कोकण २९, नागपूर ६ आणि मुंबईतून ३९ तक्रारी ई-मेलद्वारे आल्या आहेत. १७ महिलांनी आपला पत्ता सांगितला नाही. त्यामुळे या तक्रारी कोणत्या विभागातून आल्या आहेत हे स्पष्ट होत नाही. एकंदरीत लॉकडाऊन कालावधीमध्ये १७१ तक्रारी आमच्याकडे आल्या असल्याचे लुथरा यांनी सांगितले.

सद्यस्थितीमध्ये महिला आणि तिच्या पतीला आयोगाच्या कार्यालयात येणे शक्य नाही. त्यामुळे जिल्हा किंवा तालुकास्तरावर असलेल्या आमच्या समुपदेशकामार्फत मोबाईलच्या माध्यमातून या दोघांचे समुपदेशन केले जात आहे. आवश्यक वाटल्यास पोलिसांची मदत घेतली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.